1/KS

मुंबई महानगर प्रदेशातील मेट्रो रेल्वे
(MRTS) प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी
उच्चाधिकार समितीची स्थापना करणे बाबत

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: एमआरडी-३३१३/प्र.क्र.८४/नवि-७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक : ०४ सप्टेंबर, २०१३.

**प्रस्तावना :**

मुंबई महानगर प्रदेशातील सार्वजनिक वाहतुकीत सुधारणा करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्था (MASS RAPID TRANSIT SYSTEM (MRTS) अंतर्गत टप्प्याटप्प्याने मेट्रो रेल्वे प्रकल्प राबविण्याची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व सिडको मार्फत सुरु आहे.

वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या मुंबई मेट्रो रेल्वे छन्नमार्गावर (मुंबई मेट्रो रेल्वे लाईन-१) मेट्रो रेल्वे प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात विविध स्वरुपाची कामे करणे आवश्यक असून त्यासाठी विविध संस्था/विभाग यांच्याशी समन्वय साधण्याची आवश्यकता असल्याने सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसंबंधात विविध संस्थांशी/विभागाशी समन्वय साधून प्रकल्पाची अंमलबजावणी तातडीने करण्याकरीता मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली नगर विकास विभागाचा शा.नि.क्र. बैठक/एमआरडी-३३०७/सं.क्र.१४९१/नवि-७ दिनांक ३१ जानेवारी, २००८ अन्वये उच्च स्तरीय सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे. तथापि मुंबई महानगर प्रदेशात सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्था/प्रकल्प (MASS RAPID TRANSIT SYSTEM (MRTS) या अंतर्गत विविध प्रकल्प राबविण्यात येत/येणार असल्याने मुंबई मेट्रो रेल्वे लाईन-१ साठी स्थापन केलेली वर उल्लेखित उच्च स्तरीय सुकाणू समिती अधिक्रमित करुन मुंबई महानगर प्रदेशातील सर्व सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्था/प्रकल्प (MASS RAPID TRANSIT SYSTEM (MRTS)/ मेट्रो रेल्वे प्रकल्पासांठी एकच सामाईक उच्चाधिकार समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

AMC MMRDA
Pl convene first meeting on 6/X/13
18/10/13
PA

या संदर्भात सर्वंकष विचार करुन शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे :-

**शासन निर्णय :**

मुंबई महानगर प्रदेशात सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्था (MASS RAPID TRANSIT SYSTEM (MRTS)/ मेट्रो रेल्वे या अंतर्गत विविध प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याकामी विविध विभागांशी/संस्थांशी समन्वय साधून अशा प्रकल्पांची सुरळीतपणे

अंमलबजावणी करण्याकरीता मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली पुढील प्रमाणे उच्चाधिकार समिती गठित करण्यात येत आहे.

| क्रमांक | उच्चाधिकार समितीचे सदस्य | |
|---|---|---|
| १ | मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई- ३२ | अध्यक्ष |
| २ | अप्पर मुख्य सचिव, महसुल विभाग, मंत्रालय मुंबई - ३२ | सदस्य |
| ३ | अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय मुंबई - ३२ | सदस्य |
| ४ | प्रधान सचिव नगर विकास विभाग (१), मंत्रालय मुंबई - ३२ | सदस्य |
| ५ | प्रधान सचिव, नगर विकास - २, मंत्रालय मुंबई - ३२ | सदस्य |
| ६ | महानगर आयुक्त, महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पूर्व) - ५१ | सदस्य |
| ७ | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई - १. | सदस्य |
| ८ | व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (मर्या.), निर्मल भवन, मुंबई | सदस्य |
| ९ | आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, | सदस्य |
| १० | सह पोलिस आयुक्त (वाहतूक) मुंबई पोलिस, वरळी, मुंबई | सदस्य |
| ११ | महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे | सदस्य |
| १२ | महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे | सदस्य |
| १३ | अतिरिक्त महानगर आयुक्त (१), महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पूर्व) - मुंबई ५१ | सदस्य सचिव |

२. मुंबई महानगर प्रदेशात सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्था (MASS RAPID TRANSIT SYSTEM (MRTS) / मेट्रो रेल्वे या अंतर्गत प्रकल्पांशी संबंधित सहकार्य अपेक्षित असलेल्या खालील अधिकाऱ्यांना सदर उच्चाधिकार समितीच्या बैठकांना आवश्यकतेप्रमाणे निमंत्रित करता येईल.

| क्रमांक | उच्चाधिकार समिती (निमंत्रित सदस्य) |
|---|---|
| १ | सचिव, पशु संवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ |
| २ | पोलीस आयुक्त, मुंबई /नवी मुंबई. |
| ३ | उपाध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई |
| ४ | मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन मंडळ, मुंबई |
| ५ | जिल्हाधिकारी मुंबई शहर जिल्हा, मुंबई. |
| ६ | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई. |
| ७ | जिल्हाधिकारी, ठाणे |
| ८ | जिल्हाधिकारी, रायगड |
| ९ | व्यवस्थापकीय संचालक, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मर्यादित मुंबई |
| १० | मुंबई महानगर प्रदेशातील संबधित महानगरपालिका आयुक्त/ नगरपरिषदांचे मुख्याधिकारी |

उच्चाधिकार समितीच्या बैठकीसाठी आवश्यकतेप्रमाणे कोणत्याही विभागाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास बोलविण्याचे अधिकार सदर समितीस राहतील.

**३. उच्चाधिकार समितीची कार्यकक्षा :-**

१) सार्वजनिक जलद वाहतूक व्यवस्था (MASS RAPID TRANSIT SYSTEM(MRTS)/ मेट्रो रेल्वे प्रकल्पांच्या कामाचा आढावा घेण्याकरिता मासिक बैठका घेणे.

२) सदर प्रकल्पांची अंमलबजावणी सत्वर व प्रभावीपणे होण्याच्यादृष्टीने विविध विभाग व संस्थांशी समन्वय साधणे.

३) सदर प्रकल्पांच्या अंमलबजावणी संबंधात येणा-या अडचणी सोडविणे व संबंधितांना मार्गदर्शन करणे.

४) सदर प्रकल्पांची अंमलबजावणी विहित कालावधीत पूर्ण होईल याकरीता आवश्यक ते उपाय योजणे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

(एस. के. सालीमठ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
मा. राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई- ३२
अप्पर मुख्य सचिव, महसुल विभाग, मंत्रालय मुंबई - ३२
अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय मुंबई - ३२
प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय मुंबई - ३२
प्रधान सचिव नगर विकास विभाग (१), मंत्रालय मुंबई - ३२
प्रधान सचिव, नगर विकास (२), मंत्रालय मुंबई - ३२
सचिव (पदुम) मंत्रालय, मुंबई-३२
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई - १
महानगर आयुक्त, महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पूर्व) - ५१
पोलिस आयुक्त मुंबई/नवी मुंबई.
उपाध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा), मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, सिडको, निर्मल भवन मुंबई
आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका,
मुंबई महानगर प्रदेशातील संबधित महानगरपालिका आयुक्त
सह पोलिस आयुक्त (वाहतूक) मुंबई पोलिस, वरळी, मुंबई
अतिरिक्त महानगर आयुक्त (१), महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पूर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई.
महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई